# Washim District Police

**Nature of Work** :- **Chain snatcher arrested**

**Police Station** :- **Local Crime Branch**

**Date of Good Work done** :- **11/01/2023**

**Brief of the work done :-**

चेन स्नचींग प्रकरणातील 6 महिन्यांपासून फरार आरोपीस अटक.

---

## चेन स्नॅचींग प्रकरणातील फरार आरोपी जेरबंद

**वाशीम**, दि. ११ (प्रतिनिधी)



देवदर्शनावरुन परत जात असताना महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोथ दुचाकीने आलेल्या दोघांनी हिसकावून पोबारा केला. या घटनेतील आरोपीला जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले असून संघपाल भारत कांबळे असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

पोलीस सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, शहरातील बालाजी मंदिरातून देवदर्शन करुन घरी परत असताना एका महिलेच्या गळ्यातील ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची पोथ चोरट्यांनी हिसकावून घेत पोबारा केला. या प्रकरणी प्राप्त तक्रारीवरुन पोलिसांनी दोघांविरुध्द गुन्हा दाखल करुन प्रकरण तपासात घेतले. दरम्यान, यातील आरोपी संघपाल कांबळे याला पोलिसांनी मुंबई येथून ताब्यात घेतले असून त्याचे साथीदाराच्या शोध पोलीस घेत आहेत. नागरिकांनी अश्या प्रकारचे गैरव्यवहार व संशयास्पद हालचाली लक्षात आल्यास त्याची माहिती तात्काळ पोलीस प्रशासनास द्यावी, असे आवाहन वाशिम जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे. सदर कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव,सुनील पवार, दीपक सोनवणे, गजानन अवगळे,प्रशांत राजगुरू, संदीप डाखोरे या स्थानिक गुन्हे शाखेच्या व सायबर सेलच्या गोपाल चौधरी यांच्या पथकाने केली.

## एसपीच्या नावाने पोलीस पाटलांकडून पैशांची मागणी

**मंगरुळपीर :** तालुक्यातील दाभा येथील पोलीस पाटील व अन्य एका पोलीस पाटलास जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या नावाने पन्नास हजार रुपयांची मागणी करण्यात आली. या प्रकरणी पोलीसांनी ११ जानेवारी रोजी गुन्हा दाखल केला आहे.

अनंता काळे यांनी पोलीसात तक्रार दिली की, फिर्यादीची पत्नी शारदा काळे मागील चार वर्षापासुन दाभा येथे पोलीस पाटील या पदावर नेमणुकीस आहे. त्यांची पत्नी व मंगळसा येथील पोलीस पाटील सुनील ठाकरे यांना एका मोबाईलनंबरवरुन पोलीस अधीक्षकांचा फोटो व नाव पाठवून पन्नास हजाराची मागणी करण्यात आली. अशा तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा दाखल केला.